जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, गडचिरोली या कार्यालयाची इमारत दुरुस्तीच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं-२०२५/प्र.क्र.१३३/ई-१३८०३७२/ग्रं.क.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२६.

ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
दिनांक : ११/२/२६
आवक क्र. ५४८
कार्यासन क्र. ३४

वाचा : ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३४/इमारत नुतनीकरण-गडचिरोली/२०२४-२५/ ४९६७, दि.०३.१२.२०२५

प्रस्तावना :

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, गडचिरोली या इमारतीच्या बांधकामास ११ वर्षे पुर्ण झाली असून सदर कालावधीमध्ये इमारतीच्या दुरुस्ती/नुतनीकरणाची कामे झालेली नाहीत. त्यानुषंगाने संपुर्ण इमारत, संरक्षण भिंत, वाहनतळ यांचे रंगरंगोटी करणे, इमारतीमधील प्लबिंग, छताचे कोटींग करणे, खिडक्या, दरवाजे व इतर साहित्याची दुरुस्ती व पाण्याच्या टाक्या बसविणे व अन्य आवश्यक बाबींसाठी रु. ३४,७७,०००/- (अक्षरी रुपये चौतीस लक्ष सत्याहत्तर हजार फक्त) इतक्या रकमेच्या कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये ग्रंथालय संचालनालयाने सादर केला आहे.

२. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर यांनी जिल्हा ग्रंथालय अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाच्या नुतनीकरणाच्या आवश्यक बाबींच्या कामासाठी रु.३४,७७,०००/- (अक्षरी रुपये चौतीस लक्ष सत्याहत्तर हजार फक्त) इतक्या अंदाजपत्रकास तांत्रिक सहमती प्रदान केली आहे. त्यानुसार सदर कामासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, गडचिरोली या कार्यालयाच्या नुतनीकरणाच्या/दुरुस्तीच्या कामासाठी रु.३४,७७,०००/- (अक्षरी रुपये चौतीस लक्ष सत्याहत्तर हजार फक्त) इतक्या निधीच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. :-

१) प्रत्यक्ष काम करताना प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याबाबतची दक्षता ग्रंथालय संचालनालयाने घ्यावी.

का.३

महत्वाचे

11/2/26

२) प्रत्यक्ष कामास सुरुवात करताना आवश्यक त्या मान्यता घेऊनच काम हाती घ्यावे.

३) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

४) प्रस्तावातील खरेदीशी संबंधित बाबींकरिता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

५) सदर काम हेरिटेज इमारती अंतर्गत येत असल्यास त्यास संबंधितांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

२. सदर कामासाठी येणारा खर्च मागणी क्र.एच-८, लेखाशिर्ष ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, १०५, सार्वजनिक ग्रंथालये (००) (०१) मोठी बांधकामे (कार्यक्रम) (४२०२ ०४८२) ५३- मोठी बांधकामे या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने ग्रंथालय संचालनालयाने आवश्यक कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय हा वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.२०.०९.२०१९ च्या शासन निर्णयातील भाग एक उपविभाग-५ परि.क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दि.२५.०९.२०१९ मधील परि.४ मधील तरतुदीस अनुसरुन प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१११८१११९४४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A3682DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.02.11 18:12:13 +05'30'

(अ.ता.कुंडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई

४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
८. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर
९. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचिरोली
११.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गडचिरोली
१२.जिल्हा ग्रंथालय अधिकारी, जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, गडचिरोली
१३.निवड नस्ती, ग्रंथालय कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.